असा. क्र. १७

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-२०३/एमबीआय/२००२

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, जानेवारी १५, २००२/पौष २५, शके १९२३**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ जानेवारी २००२

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

क्रमांक ग्रापनि. १००१/प्र. क्र. २४७/०६.—ज्याअर्थी, महाराष्ट्र पंचायत समित्या (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. पाच) (यात यापुढे ज्याचा " उक्त अधिनियम " असा निर्देश केलेला आहे) याच्या कलम २७४ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकान्वये हे नियम पूर्वप्रसिद्ध करण्याची आवश्यकता नाही, अशी परिस्थिती निर्माण झाल्याबाबत, महाराष्ट्र शासनाची खात्री झाली आहे ;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम १४ च्या पोट-कलम (२) सह कलम २७४ च्या पोट-कलम (२) चा खंड (तीन) व पोट-कलम (३) चे परंतुक तसेच कलम ५८ चे पोट-कलम (एक ई), याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र पंचायत समित्या (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र पंचायत समित्या (मतदार विभाग व निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २००२ असे म्हणावे.



J-1243 (57)

२. महाराष्ट्र पंचायत समित्या (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १६-अ मध्ये " रुपये दोनशे पन्नास " आणि " रुपये शंभर " या मजकुराऐवजी " रुपये सातशे " आणि " रुपये तीनशे पन्नास " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कुंदा गोसावी,
शासनाच्या उप सचिव.

J-12431(58)

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 15th January 2002.

### *NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. GPN. 1001/CR 247/06.—Whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra Panchayat Samitis (Electoral Colleges and Conduct of Election) Rules, 1962 and to dispense with the conditions of previous publication thereof under the proviso to sub-section (*3*) of section 274 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961(Mah. V of 1962) (hereinafter refferred to as ' the said Act ') ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (iii) of sub-section (2) and the proviso to sub-section (*3*) of section 274 read with sub-section (2) of section 14, and sub-section (*IE*) of section 58 of the said Act, and all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Panchayat Samitis (Electoral Colleges and Conduct of Election) Rules, 1962, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Panchayat Samitis (Electoral Colleges and Conduct of Election) (Amendment) Rules, 2002.

2. In rule 16-A of the Maharashtra Panchayat Samitis (Electoral Colleges and Conduct of Elections) Rules, 1962, for the words 'rupees two hundred and fifty' and 'rupees one hundred' the words 'rupees seven hundred' and 'rupees three hundred and fifty' shall, respectively, be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

KUNDA GOSAVI,
Deputy Secretary to Government.

J-124312(59)

## ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ जानेवारी २००२

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

क्रमांक ग्रापनि- १००१/प्र. क्र. २४७/०६.—ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. पाच) (यात यापुढे ज्याचा " उक्त अधिनियम " असा निर्देश केलेला आहे) याच्या कलम २७४ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकान्वये हे नियम पूर्वप्रसिद्ध करण्याची आवश्यकता नाही, अशी परिस्थिती निर्माण झाल्याबाबत, महाराष्ट्र शासनाची खात्री झाली आहे ;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम १४ च्या पोट-कलम (२) सह कलम २७४ च्या पोट-कलम (२) चा खंड (तीन) व पोट-कलम (३) चे परंतुक याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग व निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २००२ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १७ मध्ये " पाचशे रुपयांची " आणि " दोनशे रुपयांची " या मजकुराऐवजी " एक हजार रुपयांची " आणि " पाचशे रुपयांची " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कुंदा गोसावी,**
शासनाच्या उप सचिव.

J-12431 (60)